Estd. 1962

"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४—२५ करीता उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांसाठी कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करणेबाबत...

**संदर्भ :** शासन आदेश क्र.संकिर्ण—२०२५/ई—९७०२२० /विशि—३ दि.१० फेब्रुवारी २०२५

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या उपरोक्त संदर्भीत शासन आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०२४—२५ करीता अभियांत्रिकी अभ्यासक्रमांशी संबंधित विद्यार्थ्यांसाठी कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात निर्देश देण्यात आले आहेत. सोबत शासन आदेशाची प्रत जोडली आहे. सबब, याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर परिपत्रक सर्व संबंधित विद्यार्थी व शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.

आदेशावरुन,

उपकुलसचिव

सोबत : वरीलप्रमाणे.
संदर्भ/जा.क्र/शिवाजी वि/अ.मं./१२६
दिनांक : १९/०३/२०२५

प्रत : माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

१) प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये.
२) संचालक, तंत्रज्ञान अधिविभाग.
३) संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ.
४) प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा.
५) पात्रता विभाग
६) परीक्षक नियुक्ती ए व बी विभाग
७) आय. टी. सेल
८) इतर परीक्षा ४ विभाग

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांसाठी कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन आदेश क्र.संकीर्ण-२०२५/ई-९७०२२०/विशि-३**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- १० फेब्रुवारी, २०२५

**संदर्भ:** संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/कॅरी ऑन/२०२५/४०, दिनांक १७.०१.२०२५

**प्रस्तावना:**

अभियांत्रिकी अभ्यासक्रमांशी संबंधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबतची मागणी विद्यार्थी/ विद्यार्थी संघटना/सिनेट सदस्य/लोकप्रतिनिधी यांचेकडून करण्यात आली आहे.

संदर्भाधीन पत्रान्वये संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कळविल्याप्रमाणे राज्यातील काही विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता अभियांत्रिकी अभ्यासक्रमांशी संबंधित विद्यार्थ्यांना कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करुन दिली आहे तर काही विद्यापीठांनी अशी सुविधा उपलब्ध करुन दिलेली नाही. तथापि, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांशी संबंधित विद्यार्थ्यांना कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये एकसमानता आणण्यासाठी अशा सर्व अकृषि विद्यापीठांना त्याबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन आदेश:**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५ (८१) मधील अधिकारांचा वापर करून राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांना तसेच, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, अधिनियम, २०१४ मधील कलम ९४ मधील तरतुदीनुसार त्या विद्यापीठास पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

(१) प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या ५ व्या सत्राकरिता, व्दितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या ७ व्या सत्राकरिता तसेच वरील वर्गात प्रवेश देण्याची पात्रता ही सम सत्र २०२३-२४ (म्हणजे उन्हाळी परीक्षा २०२३-२४) च्या परीक्षांच्या निकाला ऐवजी विषम सत्र २०२४-२५ (म्हणजे हिवाळी परीक्षा २०२४-२५) च्या निकालांवर ठरवावी.

(२) अशा प्रकारे पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या विषम (हिवाळी) व सम (उन्हाळी) सत्राच्या परीक्षा एकत्रित सम (उन्हाळी) सत्राच्या परीक्षांसोबत घेण्यात याव्यात.

(३) अशा प्रकारे वरील वर्गात प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे विषम सत्राचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल आणि यासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडे आवश्यक हमीपत्र भरून द्यावे लागेल.

२. ज्या विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता carry on ची सुविधा त्यांच्या विद्यार्थ्यांना यापूर्वीच दिली असेल, अशा विद्यापीठांना सदर निर्देश लागू असणार नाहीत.

३. सदर निर्देश अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये केवळ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता लागू राहतील व या निर्देशांचा संदर्भ पुढील वर्षामध्ये घेता येणार नाही.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२५०२१०१२१७०१५६०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC96D8D24A198FD0E7310BBE859, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2025.02.10 12:18:18 +05'30'

**(प्र. पां. लुबाळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :**

१) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) कुलगुरू, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
५) कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड,
६) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) सह सचिव/ उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९) निवड नस्ती (विशि-३) , उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.